Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# ऐतिहासिक सिंदखेडराजाचा राजकीय इतिहास

**डॉ. राजेंद्रसिंग हिरासिंग देवरे**
प्राध्यापक आणि इतिहास विभागप्रमुख
श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
देऊळगाव राजा, जि. बुलढाणा

**सारांश:**
मध्ययुगीन ऐतिहासिक वारसा लाभलेले सिंदखेड राजा (जि. बुलढाणा) हे गाव महाराष्ट्राच्या भावविश्वात एक पर्यटन स्थळ, राष्ट्रमाता जिजाऊंचे जन्मस्थान व सोबतच जिजाऊ व शिवभक्तांचे प्रेरणास्त्रोत म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. साधारणत: १२ व्या शतकापासून सिंदखेड राजाचा एक धार्मिक ठिकाण म्हणून उल्लेख सापडतो, मात्र राजे लखुजी जाधवराव यांच्या काळापासून सिंदखेड राजाला धार्मिकपेक्षा राजकीयदृष्ट्या महत्त्व प्राप्त होऊन सिंदखेड राजा हे राजकीय घडामोडीचे महत्त्वाचे केंद्र बनले होते. भारताचा इतिहास हा वेगवेगळ्या राजसत्तांचा इतिहास असल्यामुळे सिंदखेड राजाही त्यास अपवाद ठरले नाही. त्यामुळे १२ व्या शतकापासून १९४७ पर्यंत सिंदखेड राजा वेगवेगळ्या राजवटींच्या ताब्यात होते. त्यामध्ये जाधव घराण्याचा कालखंड हा सिंदखेड राजाच्या दृष्टीने विकासाचा व वैभवाचा कालखंड होता. जाधव घराण्यानंतर मात्र इतर कोणत्याही सत्ताकाळात सिंदखेड राजाला जाधवकालीन वैभव पुन्हा प्राप्त होऊ शकले नाही. आज महाराष्ट्र सरकारने राजमाता जिजाऊ यांचे जन्म ठिकाण म्हणून तालुक्याचा दर्जा दिल्याने सिंदखेड राजाचे महत्त्व पुन्हा वाढत असल्याचे दिसून येते.

**बिजसंज्ञा:** सिंदखेड राजा, लखुजी राजे, राजमाता जिजाऊ, राव जगदेवराव, जाधव, काझी, मुळे, भोसले, शिंदे घराणे, निजाम व इंग्रज.

**प्रस्तावना :**

'विदर्भाचे प्रवेशद्वार' म्हणून ओळखले जाणारे सिंदखेड राजा हे बुलडाणा जिल्हा मुख्यालयापासून ८२ कि.मी. अंतरावर, मेहकरच्या नैऋत्य बाजूस, औरंगाबाद- नागपूर महामार्गावर जालना येथून २७ कि. मी. अंतरावर वसलेले ऐतिहासिक ठिकाण आहे. राजे लखुजी जाधवराव व त्यांच्यानंतरही काही काळापर्यंत जाधव घराण्याच्या राजधानीचे ठिकाण असल्यामुळे सिंदखेड राजाला वैभव प्राप्त झाले होते. जाधव घराण्यानंतर सिंदखेड राजाचे वैभव संपुष्टात आल्याचे दिसते. कारण, १८०३ मध्ये आसई (ता. जाफराबाद जि. जालना) या गावी लॉर्ड वेलस्ली विरुद्ध शिंदे व भोसले यांच्यात युद्ध होऊन युद्धात शिंदे व भोसले यांचा पराभव झाला. त्यानंतर लॉर्ड वेलस्ली हा बुलडाणा जिल्ह्यातून जालन्याकडे प्रवास करीत असताना, त्याने सिंदखेड राजाचे वर्णन, "Sindkhed is a nest of thieves. The situation of this country is shocking the people are straving in hundreds and there is a no government to afford the slightest relief." असे केले आहे.[१] त्यामुळे प्रस्तुत शोधनिबंधात सिंदखेड राजा हे जाधव घराणे व त्यानंतर कोणकोणत्या घराण्याच्या सत्तेच्या राजवटीखाली होते, याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये :**

'ऐतिहासिक सिंदखेड राजाचा राजकीय इतिहास' या शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

१) सिंदखेड राजाच्या राजकीय इतिहासाचा शोध घेणे.

२) स्थानिक इतिहास प्रकाशात आणणे.

३) सिंदखेड राजाच्या दृष्टीने जाधव घराण्याचे महत्त्व अभ्यासणे.

४) सिंदखेड राजावर राज्य करणाऱ्या घराण्यांचा शोध घेणे.

**शोधनिबंधाची गृहीतके :**

'ऐतिहासिक सिंदखेड राजाचा राजकीय इतिहास' या शोधनिबंधाची गृहीतके पुढील प्रमाणे आहे.

१) मध्ययुगीन व आधुनिक कालखंडात सिंदखेड राजावर वेगवेगळ्या घराण्यांची सत्ता असल्याचे दिसून येते.

२) सिंदखेड राजाला वैभव व नावलौकिक प्राप्त करून देण्यामध्ये जाधव घराण्याचे मोठे योगदान असल्याचे दिसते.

३) सिंदखेड राजासाठी जाधव घराण्याचा कालखंड हा समृद्ध कालखंड असल्याचे दिसून येते.

४) सिंदखेड राजा हे एक पर्यटनस्थळ म्हणून विकसित होण्यास जाधव घराण्याचा मोलाचा वाटा असल्याचे दिसते.

५) जाधव घराण्याच्या सत्ता ऱ्हासानंतर सिंद्खेडचे वैभव संपुष्टात आल्याचे दिसून येते.

**संशोधन पध्दती:**

'ऐतिहासिक सिंदखेड राजाचा राजकीय इतिहास' या शोधनिबंधासाठी 'संदर्भ पद्धती'चा वापर करण्यात आला आहे. संदर्भ पद्धतीमध्ये संदर्भ साधनांना महत्त्वाचे स्थान असल्यामुळे सदर शोधनिबंधासाठी उपलब्ध असलेल्या प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करून सदर संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

**सिंदखेड राजा हे नाव कसे पडले? :**

लखुजी जाधवरावांना सिंदखेडची देशमुखी मिळण्यापूर्वी सिंदखेडचे मूळ नाव काय होते? याबाबतचे काही उल्लेख मिळतात, ते पुढीलप्रमाणे.

१) सिंदखेडचे मूळ नाव आलापूर असल्याचे जाधवरावांच्या बखरीत नमूद आहे. पुढे गवळी राजा सिंधूराज याने येथे वस्ती केली, म्हणून आलापूरचे नाव 'सिंदखेड' असे पडले. सिंधूराजाच्या राजवटीचा कुठलाच पुरावा मिळत नाही, मात्र त्यांच्या घराण्यातील चार राजांच्या नावाचा उल्लेख जाधव घराण्याच्या बखरीत सापडतो.[२]

२) सिंदखेड येथे सिंदीची झाडे अधिक असल्यामुळे 'सिंदी'वरून सिंदखेड हे नाव पडले असावे.[३]

३) सिंदखेडचे मूळ नाव 'सिध्दपूर' असल्याचा एक पुरावा निळकंठेश्वराच्या देवालयामधील शिलालेखावर उपलब्ध आहे. त्यामध्ये 'परगणे सिध्दपूर' असा उल्लेख आढळतो.[४]

४) आणखी एक पुरावा सिंदखेडचे सुप्रसिध्द संत कवी गोसावीनंदन यांच्या एका ओवीबध्द चरित्रामध्ये आढळतो. तो असा.

सिंदखेड स्थळ | सिध्दाचे केवळ ||

देखोनी तात्काळ | वास केला ||[५]

उपरोक्त विवेचनावरून सिंदखेडचे मूळ नाव काय होते? याविषयी वेगवेगळे मतप्रवाह प्रचलित असले, तरी सिंदखेडचे मूळ नाव 'सिध्दक्षेत्र' असावे आणि या सिध्दक्षेत्राचा अपभ्रंश 'सिंदखेड' असा झाला असावा. पुढे राजे लखुजी जाधवराव हे सिंदखेडला स्थायिक झाल्यानंतर सिंदखेडचे 'सिंदखेड राजा' असे नामकरण झाले, एवढे निश्चित.

**सिंदखेड राजाचे इतिहासातील महत्त्व :-**

आज सिंदखेड राजाची खरी ओळख राष्ट्रमाता जिजाऊंचे जन्मस्थान म्हणून आहे. यासोबत १६३२ ते १६३४ या काळात बालशिवबांचे वास्तव्य सिंदखेड राजा येथे होते. यावेळी जिजाऊ व बालशिवबा यांचे सिंदखेड राजा येथे झालेले आगमन आणि त्यांचा पुण्याला परत जाण्याचा प्रसंग हा क्षण लखुजी बंधू राजे भूतजी उर्फ जगदेवराव व सिंदखेडवासियांनी एखाद्या उत्सवाप्रमाणे साजरा केल्याचा उल्लेख सापडतो. त्यामुळे जिजाऊंच्या जन्माने व बालशिवबाच्या पदस्पर्शाने पुनीत झालेले सिंदखेड राजा हे पवित्र स्थळ आहे. त्यामुळेच मल्हारराव होळकर यांनी मानसिंगराव जाधव यांना "तुम्ही म-हाटे याची काशी आहात,"[६] असे म्हटले आहे. यावरून महाराष्ट्राच्या भावविश्वात सिंदखेड राजाचे महत्त्व लक्षात येते.

जाधव घराण्यापूर्वी सिंदखेड राजा येथे नीळकंठेश्वर मंदिर, पुतळा बारव, शरभंग ऋषीचा आश्रम (आज अस्तित्वात नाही) रामेश्वर मंदिर इत्यादी वास्तू अस्तित्वात होत्या. रामेश्वर मंदिराच्या संदर्भात प्रभू रामचंद्र लंकेला जात असताना त्यांनी येथे रामेश्वराचे लिंग स्थापन केल्याची पारंपरिक आख्यायिका सांगितली जाते. तसेच इ. स. १५८७ मध्ये लखुजी पुत्र राघोजी यांनी नीळकंठेश्वर मंदिराचा जीर्णोध्दार केल्याचा उल्लेख येथील एका शिलालेखावरून मिळतो.[७] यावरून जाधव घराण्यापूर्वी सिंदखेड राजा हे धार्मिक ठिकाण असल्याचे सिद्ध होते.

सिंदखेड राजाला पूर्वीपासूनच इतिहासाशी नाते सांगणा-या जुने मंदिर-२५, मठ-०३, मशिदी -२,दर्गे-२ चावड्या, भव्य वाडे, तलाव व बारवा[८] या ऐतिहासिक वास्तूंमुळे एक ऐतिहासिक समृध्द स्थान आणि पर्यटन स्थळ म्हणून जनमान्यता मिळालेली आहे. एकेकाळी विशेष प्रसिध्द असलेल्या या वास्तुतील काही वास्तू आजही चांगल्या स्थितीत आहे, तर काही वास्तू काळाशी झगडत आपल्या ऐतिहासिकत्वाची साक्ष देत कशाबशा उभ्या आहेत. त्यामध्ये जाधवपूर्वकालीन धार्मिक वास्तुमध्ये रामेश्वर मंदिर, नीळकंठेश्वर मंदिर व नीळकंठेश्वर बारवेचा समावेश होतो. लखुजी राजांच्या काळात जाधव घराण्याचे निवासस्थान असलेले व जिजामातेचा जन्म झाला तो राजवाडा, रंगमहाल, सावकारवाडा या वास्तुंची निर्मिती झाली. राजे भुतजी यांनी बंधू प्रेमाचे प्रतीक असलेली लखुजी राजांची समाधी बांधली. राव जगदेवराव यांच्या काळात अर्धवट अवस्थेत असलेला काळाकोट, मोती तलाव, चांदणी तलाव, पुतळा बारव, सजना बारव, गंगासागर बारव, बाळसमुद्र विहीर, अन्न छत्र विहीर, रंग महाल इत्यादी बांधकामे झाली. या सर्व वास्तुंमध्ये रामेश्वर मंदिर, नीळकंठेश्वर मंदिर, लखुजी राजांचा राजवाडा, लखुजी राजांची समाधी व अर्धवट अवस्थेत असलेला काळाकोट विशेष प्रसिध्द आहे. या वास्तूंमुळे आज सिंदखेड राजा हे एक ऐतिहासिक धार्मिक व पर्यटनस्थळ म्हणूनही प्रसिध्द आहे.

**सिंदखेडचा राजकीय इतिहास:-**

सिंदखेड राजाबद्दलची जाधवपूर्वकालीन लिखित माहिती फारशी उपलब्ध होत नाही, मात्र मध्ययुगीन कालखंडात सिंदखेड हे मेहकर सरकारांतर्गत परगण्याचे ठिकाण म्हणून प्रसिध्द होते. इ. स. १२६०-१२७१ च्या दरम्यान देवगिरीच्या यादवांचा प्रधान हेमाद्रीपंथ उर्फ हेमाडपंथ याने बुलडाणा जिल्ह्यातील तीस भागात देवळे बांधली होती. त्यामध्ये सिंदखेड राजाचाही उल्लेख सापडतो.[९] त्यामुळे यादव काळापासून सिंदखेड राजाचा बुलडाणा जिल्ह्यात आणि बुलडाणा जिल्ह्याचा व-हाड सुभ्यात अंतर्भाव होत असल्याचे दिसते.

**सिंदखेड येथे काझी घराण्याची सत्ता :**

मध्ययुगीन कालखंडात सिंदखेड एक परगण्याचे ठिकाण होते आणि जाधव घराण्याकडे सिंदखेडची जहागिरी हस्तांतरीत होण्यापूर्वी या परगण्याची जहागिरी इ. स. १४५० च्या सुमारास १०० वर्षे स्थानिक 'काझी' घराण्याकडे होती.[१०] ही जहागिरी त्यांच्याकडे कशी आली ? याबद्दलची माहिती मिळत नाही. मात्र, काझी घराण्यातील पुरुष आपला सामाजिक व राजकीय वारसा जपून असल्याने त्यांना 'शौरतपन्हाधर्मरक्षक काझी' (गावातील प्रसिध्द पुरुष) अशी पदवी दिलेली दिसते.[११] यावरून सिंदखेड येथे काझी घराण्याची सत्ता होती आणि सत्ता गेल्यानंतरही ते समाजातील आपली प्रतिष्ठा टिकवून होते.

**सिंदखेडवर मुळे घराण्याची सत्ता :**

१४५० च्या सुमारास सिंदखेड परगण्याची जहागिरी काझी घराण्याकडे होती. त्यानंतर सदर जहागिरी ही काझीकडून 'मुळे' घराण्याकडे आली. मुळे घराणे हे जातीने ब्राम्हण असून इ. स. १५७६ पर्यंत सिंदखेडचे देशमुखी वतन त्यांच्याकडे होते.[१२] रविराव ढोणे हा मुळे घराण्याचा कारभारी होता. त्याने वतन प्राप्तीकरिता मुळे घराण्याची कत्तल करून, सिंदखेडचे देशमुखी वतन आपल्या ताब्यात घेतले होते, मात्र या कत्तलीतून यमुनाबाई ही मुळे घराण्यातील स्त्री वाचली होती. तिने लखुजी राजांकडे रविराव ढोणे याची तक्रार केली. त्यानुसार लखुजी राजांनी सिंदखेड राजा येथे येऊन रविराव ढोणे यास ठार मारले व मुळे घराण्यास न्याय मिळवून दिला. त्यामुळे यमुनाबाईने इ.स. १५७३ मध्ये सिंदखेडचे देशमुखी वतन लखुजी राजांच्या नावे लिहून दिले.[१३]

**सिंदखेडवर जाधव घराण्याची सत्ता आणि सिंदखेडची भरभराट :**

यमुनाबाई मुळे यांनी सिंदखेडचे आपले देशमुखी वतन लखुजी राजांच्या नावे करून दिल्यानंतर इ. स. १५७६ मध्ये राजे लखुजी हे सहकुटुंब सिंदखेडला वास्तव्यास आले आणि सिंदखेडचे 'सिंदखेड राजा' असे नामकरण झाले.[१४] राजे लखुजी यांना सिंदखेडला सहकुटुंब वास्तव्यास यायचे होते, म्हणून त्यांनी येथे एक टोलेजंग राजवाडा बांधण्याचे कार्य हाती घेतले. तसेच सिंदखेड राजा एक पेठ म्हणून विकसित व्हावी, यासाठी जनतेला मदत केली. शिवाय लखुजी राजे वास्तव्यास आल्यामुळे सिंदखेड राजा हे त्यांच्या राजधानीचे ठिकाण बनले. त्यामुळे यावेळेपासून सिंदखेड राजाच्या वैभवास आणि भरभराटीस सुरूवात झाली. त्यावेळी राजे लखुजी यांचे १०,००० लष्कर येथे राहात होते. म्हणूनच यावेळी सिंदखेड राजाची लोकसंख्या ४०,००० हजाराच्यावर असल्याचा उल्लेख सापडतो.[१५]

२५ जुलै १६२९ लखुजी राजांचा निजामशाहीत विश्वासघाताने खून झाला. त्यानंतर त्यांचे बंधु राजे भुतजी उर्फ जगदेवराव यांनी लखुजी राजांच्या स्मरणार्थ सिंदखेड राजा येथे लखुजी राजांची समाधी बांधली. अतिशय आकर्षक असलेली ही समाधी आजही चांगल्या अवस्थेत आहे. त्यानंतर लखुजी राजांचे पणतू, लखुजी पुत्र राघोजी यांचे नातू व दत्ताजी यांचे पुत्र राव जगदेवराव हे जहागिरीवर आले. राव जगदेवराव हे स्थापत्य कलेचे चाहते असल्यामुळे त्यांनी सिंदखेड राजा येथे अनेक बारवा खोदल्या. काळाकोट, मोती तलाव, चांदणी तलाव यांचे बांधकाम केले. या सर्व वास्तुंचे अवशेष आजही चांगल्या स्थितीत आहे. राव जगदेवराव यांना शिकारीचा छंद होता आणि ते देऊळी / देऊळगाव राजा येथे शिकारीसाठी येत असत. देऊळी हे ठिकाण त्यांना पसंत पडले होते. म्हणून त्यांनी देऊळी येथे राजवाड्याचे बांधकाम हाती घेतले होते. तसेच झालेल्या दृष्टांतानुसार त्यांनी इ. स. १६९२ मध्ये देऊळगाव राजा येथे श्री बालाजी महाराज देवस्थानची स्थापना केली.[१६] पुढे राव जगदेवराव हे सहपरिवार देऊळी येथे स्थायिक झाल्याने देऊळीचे 'देऊळगाव राजा' असे नामकरण होऊन देऊळगाव राजाच्या विकासास तर सिंदखेड राजाचे वैभव व महत्त्व कमी होण्यास सुरुवात झाल्याचे दिसते.

**सिंदखेडवर भोसले घराण्याची सत्ता :**

इ. स. १७०७ मध्ये औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर दक्षिणेतील सहा मोगल प्रांतातून 'चौथाई व सरदेशमुखी' वसूल करण्याचे अधिकार मोगलांनी शाहू महाराजांना दिले. तेव्हा, शाहू महाराजांनी परसोजी भोसले यांना 'सेनासाहेब सुभा' हा किताब (इ. स. १७०७) देऊन, व-हाडमध्ये चौथाई व सरदेशमुखीचे अधिकार बहाल केले होते. त्यामध्ये बुलडाणा जिल्ह्याचाही समावेश होता, असे डॉ. एन. डब्ल्यू ढाले यांचे म्हणणे आहे,[१७] मात्र या सुमारास व-हाडाच्या पूर्वेकडील अर्धा भाग भोसल्यांच्या तर पश्चिमेकडील भाग मोगलांच्या ताब्यात होता. कारण, शाहू महाराजांच्या सनदेत भोसल्यांकडे दिलेल्या मुलखाचे वर्णन दिले आहे. त्यामध्ये व-हाडातील पूर्व व उत्तर भागाचे वर्णन आहे. त्यामध्ये बुलडाणा जिल्ह्याचे नाव येत नाही.[१८]

इ. स. १७१३ नंतर मराठा सत्तेत पेशव्यांचा उदय झाला. त्यामुळे सातारकर राजाकडून त्यांना बुलडाणा जिल्ह्यातील पिंपळगाव राजा, मलकापूर, मेहकर, साखरखेर्डा व अमडापूर इत्यादी परगणे व गावे मोकासे म्हणून दिले. या मोकाशाबद्दल पेशवे व भोसले यांच्यात नेहमी तंटे होत असे. त्यातच या भागावर शिंदेंचाही अंमल होता. इ. स. १७२४ मध्ये साखरखेर्डा, जि. बुलडाणा येथे निजाम व मोगल यांच्यात लढाई झाली. त्या लढाईत पेशव्यांचे सहकार्य असल्यामुळे निजामाला विजय मिळाला व मोगलांचा पराभव झाला. त्यानंतर निजामाने हैद्राबाद येथे आपली स्वतंत्र सत्ता स्थापन केली.[१९] त्यामुळे साखरखेर्ड्याच्या लढाईनंतर मोगलांकडे असलेला व-हाडचा पूर्वेकडील भाग निजामाच्या ताब्यात आला. त्यामध्ये बुलडाणा जिल्ह्याचाही समावेश होता. अशाप्रकारे इ. स. १७२४ नंतर व-हाडच्या राजकारणात निजाम सत्ता देखील गुंतल्याने बुलडाणा जिल्ह्यातील राजकारणाशी भोसले, पेशवे, शिंदे व निजाम यांचा अतिशय निकटचा संबंध आल्याचे दिसते. इ. स. १७६० च्या उद्गीरच्या तहाने व-हाडच्या दक्षिणेकडील मेहकर परगणे भोसल्याकडे आल्याचे दिसते.

**सिंदखेडवर शिंद्यांची सत्ता :**

इ. स. १७४० च्या सुमारास निजाम हा दुर्बल बनला होता. त्यामुळे त्यांचे बरेच परगणे मराठ्यांनी जप्त करून, त्या सर्व परगण्यांवर जनकोजी शिंदे यास कमाविसदार (महसूल वसुली अधिकारी) नेमले होते. (इ. स. १७५७ -५८) त्यामध्ये सिंदखेड व जालन्याचा उल्लेख येतो. इ. स. १८०१ मध्ये दौलतराव शिंदे यांनी देऊळगाव राजाच्या श्री बालाजी संस्थानास सनद दिल्याचा उल्लेख सापडतो.[२०] यावेळी शिंद्यांचा सिंदखेड परगण्यावरील अंमल हा फार काळ चालल्याचे दिसत नाही. कारण, इ. स. १७७९ मध्ये व-हाड प्रांत पेशव्यांचे खासगत महाल होते आणि त्यामध्ये अमडापूर, खेरडा, मेहकर, सिंदखेड वगैरे परगण्याचा आणि त्या परगण्यातील आपली वसुली पेशवे हे कमाविसदाराच्या माध्यमातून करीत होते. याचा अर्थ यावेळी सिंदखेड परगणा हा पेशव्यांच्या ताब्यात होता.[२१] इ. स. १८०३ मध्ये इंग्रजांना हाकलून लावावे, या उद्देशाने भोसले व शिंदे विरूध्द इंग्रज गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्ली यांच्यामध्ये २३ सप्टेंबर१८०३ रोजी आसई (ता. जाफ्राबाद, जि. जालना) या गावी लढाई झाली. या लढाईमध्ये इंग्रजांनी भोसले व शिंद्यांचा पराभव केला.[२२] या लढाईत निजामाने भोसले व शिंद्यांविरूध्द इंग्रजांना मदत केली. म्हणून भोसले व शिंदे यांच्या ताब्यातील व-हाडातील प्रदेश इंग्रजांनी निजामाला देऊन टाकला. मात्र, इ. स. १८०३ नंतरही मेळघाट हा भोसल्याच्या ताब्यात, उमरखेड, अमडापूर व खेर्डा हा दक्षिणेकडील भाग पेशव्यांच्या ताब्यात, तर सिंदखेड, देऊळगाव, जालना व अजिंठा हा भाग शिंद्यांच्या ताब्यात असल्याचे दिसते.[२३]

**सिंदखेड निजामाच्या ताब्यात-**

१८२२ – १८५३ : इ. स. १८०३ आसईच्या लढाईनंतर सिंदखेड परगणा इंग्रजांनी -निजामाला देऊन टाकला होता. परंतु, काही कारणास्तव निजामाचे सिंदखेड राजाच्या परिसरातील प्रदेश शिंद्यांना दिल्याचे दिसते, तर शेवटचे म्हणजे इ. स. १८१८ च्या मराठे-इंग्रज युध्दानंतर इ. स. १८२२ च्या तहानुसार मराठ्यांच्या ताब्यातील संपूर्ण प्रदेश इंग्रजांच्या ताब्यात आला, तो इंग्रजांनी निजामाला देऊन टाकला. त्यामुळे सिंदखेडवर निजामाचे वर्चस्व निर्माण झाले होते.[२४]

**सिंदखेडवर इंग्रजांची सत्ता -**

इ. स. १८५३-१९४७ : इ. स. १७९८ मध्ये गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्लीने निजामाच्या दूर्बलतेचा फायदा घेऊन त्यास तैनाती फौज स्वीकारावयास भाग पाडले होते. तसेच तैनाती फौज पध्दतीच्या नियमानुसार तैनाती फौज स्वीकारणा-या शासकास संरक्षणाच्या बदल्यात सैन्याचा खर्च द्यावा लागत होता. त्यामुळे तैनाती फौजेची इंग्रजांना द्यावी लागणारी ५० लक्ष रु.ची रक्कम निजामाकडे बाकी होती. एवढी मोठी रक्कम देणे निजामास शक्य नसल्यामुळे त्या रकमेच्या बदल्यात्त गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसीने इ. स. १८५३ मध्ये निजामासोबत तह करून निजामाकडून व-हाड प्रांत घेतला. तो भारत स्वतंत्र (इ. स. १९४७) होईपर्यंत इंग्रजांच्या ताब्यात होता.[२५]

व-हाड प्रांत ताब्यात आल्यानंतर इंग्रजांनी व-हाड प्रांताच्या प्रशासकीय रचनेस सुरूवात केली. त्यामध्ये व-हाड 'उत्तर व-हाड' व 'दक्षिण व-हाड' असे दोन जिल्हे केले. उत्तर व-हाड म्हणजे सर्व पाईनघाट, त्याची मुख्य कचेरी 'बुलडाणा' येथे ठेवण्यात आली. दक्षिण व-हाड म्हणजे सर्व

बालाघाट त्याचे मुख्य ठिकाण 'हिंगोली' येथे ठेवण्यात आले.[२६] इ. स. १८६४ला प्रशासकीय दृष्टिकोनातून इंग्रजांनी पुन्हा उत्तर व-हाडचे पुर्ननिर्माण जिल्ह्यामध्ये केले. त्यानुसार बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर, चिखली व मेहकर यांना उत्तर व-हाडातून काढून त्याचा स्वतंत्र 'वायव्य व-हाड' हा जिल्हा तयार करण्यात आला. त्याची मुख्य कचेरी 'जानेफळ' येथे ठेवण्यात आली. त्यानंतर इ. स. १८६५ मध्ये या जिल्ह्याचे नाव 'मेहकर' ठेवण्यात आले. पुढे इ. स. १८६७ मध्ये बुलढाणा हे थंड हवेचे ठिकाण म्हणून त्यास जिल्ह्याचे ठिकाण करण्यात आले.[२७] यावेळी सिंदखेड राजा हे चिखली तालुक्यांतर्गत येत होते.

**सिंदखेड राजाला तालुक्याचा दर्जा :**

इंग्रज कालखंडात सिंदखेडचे जाधवकालीन वैभव जवळ - जवळ संपुष्टात आले होते. इ. स. १९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला, तर इ. स. १९६० ला स्वतंत्र महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्र शासनाने इ. स. १९८२ ला सिंदखेड राजाला तालुक्याचा दर्जा देऊन[२८] राजमाता जिजाऊंचे जन्मस्थळ म्हणून विकास करण्याचे ठरविले आहे. शिवाय शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर यांच्या पुढाकारातून आणि जिजाऊ भक्तांच्या दानशूरतेतून भव्य जिजाऊ सृष्टी उभारण्याचे कार्य सुरु असल्याने सिंदखेड राजाचे महत्त्व पुन्हा वाढत आहे.

**निष्कर्ष :**

१२ व्या शतकापासून सिंदखेड राजाचा इतिहासात उल्लेख येत असून सिंदखेडचे मूळ नाव आलापूर असल्याचे दिसते. त्यानंतर सिद्धपूर, सिंदखेड व त्यानंतर सिंदखेडचे 'सिंदखेड राजा' असे नामकरण झाल्याचे स्पष्ट होते. मध्ययुगीन व आधुनिक कालखंडात सिंदखेड राजावर देवगिरीचे यादव, अल्लाऊद्दीन खिलजी, तुघलक घराणे, बहामनी, इमादशाही, अहमदनगरची निजामशाही, मोगल, मराठे, हैद्राबादचा निजाम व इंग्रज इत्यादी राजवटींनी राज्य केले.[२९] मात्र या सर्व सत्तांमध्ये सिंदखेड राजाच्या दृष्टीने जाधव घराण्याचा कालखंड हा विकासाचा व वैभवाचा कालखंड होता. त्यानंतर कोणत्याही राजवटीच्या कालखंडात सिंदखेड राजाला जाधवकालीन वैभव प्राप्त करता आलेले नाही. इंग्रज कालखंडात तर सिंदखेड राजाची परिस्थिती अधिकच खराब होऊन ते लुटारूंचे केंद्र बनल्याचे दिसते. त्यामुळे जाधवपूर्व काळात सिंदखेड राजा हे एक धार्मिक ठिकाण असले, तरी खऱ्या अर्थाने जाधव घराण्यापासून सिंदखेड राजाला राजकीयदृष्ट्या महत्त्व प्राप्त झाले. तसेच जाधव घराण्याच्या वास्तव्य काळात त्यांच्या रसिकतेतून सिंदखेड राजाला विविध स्थापत्य बांधकामे झाली त्यामुळे आणि जाधव घराण्याच्या राजधानीचे ठिकाण असल्यामुळे सिंद्खेडची भरभराट घडून आली. मात्र, जाधव घराण्यातील राव जगदेवराव हे सिंदखेडहून देऊळगाव राजा येथे वास्तव्यास आल्यामुळे सिंदखेड राजाचे महत्त्व कमी होण्यास सुरुवात झाली. मात्र, १९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर महाराष्ट्र सरकारने सिंदखेड राजाचा राष्ट्रमाता जिजाऊंचे जन्म ठिकाण व एक पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्याचे ठरविल्याने तसेच १९८२ ला सिंदखेड राजाला तालुक्याचा दर्जा दिल्यामुळे सिंदखेड राजाचे महत्त्व पुन्हा वाढत असल्याचे दिसून येते.

**संदर्भ :-**

१) काळे या. मा., व-हाडचा इतिहास, बुलडाणा, १९२४, पृ. १८८-१८९
२) महाजन द. बा. (संपा.), सिंदखेडकर राजे जाधवरावांची बखर, यवतमाळ, १९६४, पृ .०४

३) Nelson A. E., Buldana District Gazzetteers, Vol. A, (Revised ed.) Bombay,१९७०, पृ.६४५
४) नीळकंठेश्वर मंदिरावरील शिलालेख
५) देशमुख विजय, सिंदखेड राजा, संचालक पुरातत्व व वस्तुसंग्रहालय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई १९८२, पृ .०२
६) जोशी द.प ., जोशी उषा (.संपा), समग्र सेतुमाधवराव पगडी, खंड -२, मराठी साहित्य परिषद (.प्र .आं), हैद्राबाद, २०१०, पृ. ७३२
७) नीळकंठेश्वर मंदिरावरील शिलालेख
८) देशमुख विजय, पूर्वोक्त, पृ .२७
९) कित्ता, पृ .२७
१०) कित्ता
११) महाजन द. बा. (संपा.), पूर्वोक्त, पृ ०४
१२) खेडेकर पुरुषोत्तम (संपा.) कन्नमवारकृत राजमाता जिजाबाई, जिजाई प्रकाशन, पुणे, २०१६, पृ. २२
१३) जाधव उ. वि.. (संपा.) राजे जाधवरावांचे घराणे, अर्थात सिंदखेड राजाचा इतिहास, १९७३, पृ. ०३
१४) कित्ता, पृ. ०४
१५) कित्ता, पृ. ०३
१६) महाजन द. बा. (संपा.), पूर्वोक्त, पृ ३५
१७) ढाले नामदेव, स्वातंत्र्य आंदोलनात बुलढाणा जिल्ह्याचे योगदान, नभ प्रकाशन, अमरावती, २०१२, पृ. २२
१८) काळे या. मा., पूर्वोक्त, पृ.१८१-१८२
१९) कित्ता, पृ.१८८ -१८९
२०) कित्ता, पृ.१९६
२१) ढाले नामदेव, पूर्वोक्त, पृ.३४-३५
२२) काळे या. मा., पूर्वोक्त, पृ.१९८-२००
२३) कित्ता, पृ.२३६
२४) कित्ता, पृ.२३६
२५) ढाले नामदेव, पूर्वोक्त, पृ.२५-२६
२६) कित्ता, पृ.२६
२७) कित्ता, पृ.२७
२८) गुलाबराव खेडेकर, आपला बुलढाणा जिल्हा, खेडेकर प्रकाशन, चिखली, २००६, पृ. ११
२९) ढाले नामदेव, पूर्वोक्त, पृ.२० -२१